**DR. AMBEDKAR COLLEGE, DEEKSHABHOOMI, NAGPUR-10**
**NATIONAL SERVICE SCHEME; 2018-19**
**REPORT OF THE SPECIAL WINTER CAMP**
**THEME: SOCIAL INTEGRITY**
**DATE: 04-10 FEBRUARY 2019**
**PLACE: WAGADARA, TAH- HINGNA, DIST- NAGPUR**

# चौथा दिवस

दिनांक:- ०७/०२/२०१९

सकाळी ५ ते ८ शिबिरार्थी व प्राध्यापकांनी योगासने व व्यायाम केले. ८.०० वाजता चहा नास्ता देऊन सकाळी ९.०० वाजता गावामध्ये स्वच्छता अभियान, सर्वधर्म समभाव, पाणी वाचवा देश वाचवा, या विषयाच्या अंतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले. पथनाट्याच्या द्वारे मतदानाचा हक्क बजावतांना मतदारांनी घ्यावयाची काळजी या विषयी जन-जागृती करण्यात आली. १२.०० वाजता विद्यार्थांना आंघोळीसाठी पाठविण्यात आले.

दुपारी १.०० वाजता विद्यार्थांना जेवण देण्यात आले. दुपारी २.०० वाजता (१)" शैक्षणिक प्रगतीसाठी ज्ञानाचे महत्व" डॉ. किशोर रेवतकर (२) राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व डॉ. विद्याधर शिवनकर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. सायंकाळी ४ वाजता विविध खेळाचे आयोजन करून विद्यार्थांना खेळाचे महत्व पटवून देण्यात आले.

सायंकाळी ७.०० संस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

- समाज प्रभोधन:- सरोज भालाधरे समूह
- लावणी:- प्रियंका कराडे
- महिला सशक्तीकरण:- दिव्या भगत समूह
- अंधश्रद्धा निर्मूलन:- गौरव महाजन
- बेखॉफ आझाद:- संगीता सोनभोईर समूह
- हागणदारीमुक्त गाव:- मयूरी लहाने समूह
- शेतकरी आत्महत्या:- तुषार वालदे
- देशभक्ती गीत:- चेतना भगत, लक्ष्मी वालदे
- मोबाइलचे दुष्परिणाम:- अमरदीप बोरकर


- विद्यार्थी जीवन :- सायली तिजारे समुह
- झाडे लावा झाडे जगवा:- मेघा जांभूळकर, प्रियंका वासनिक समुह
- औषधाचे दुष्परिणाम:- मेघा जांभूळकर समुह
- पाण्याचे महत्व:- समीर गणवीर समुह
- स्त्री-भ्रूणहत्या व हुंडाबळी:- मनाली घोडेस्वार, हर्षल जांभूळकर, प्राजक्ता शंभरकर.

संस्कृतिक कार्यक्रमाचे आभार उमेश दोनाडकर या विद्यार्थाने केले.








Unnamed Road, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-02-07(Thu) 08:55(AM)


Unnamed Road, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-02-07(Thu) 09:13(PM)




राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छ भारत अभियान
2019-02-07(Thu) 08:46(PM)


Unnamed Road, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-02-07(Thu) 08:56(AM)



# पाचवा दिवस

दिनांक:- ०८/०३/२०१९

नियमित  प्रमाणे सकाळी ५.०० वाजता विद्यार्थांनी प्राणायम, शारीरिक कसरत, व्यायाम केले. सकाळी ८.०० वाजता चहा नास्ता झाल्या नंतर जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत  व मैदानावर झाडे लावण्यात आली. सकाळी ११.०० वाजता आंघोळ व १.०० वाजता विद्यार्थांना जेवण देण्यात आले. दुपारी २.३० वाजता "साहित्य आणि विद्यार्थ्यांची सामाजिक भूमिका"- प्रा. दीपककुमार खोब्रागडे, पत्रकारिकेतील संधी सुरेंद्र गोंडाणे, " विविध क्षेत्रातील संधी" डॉ.प्रभज्योत कौर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. सायंकाळी ४.०० वाजता मनोरंजनाचा भाग म्हणून खजिन्याचा शोध हा खेळ घेण्यात आला. याची संपूर्ण जबाबदारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी सांभाळली. व विजयी गटाला परितोषिक देण्यात आले. सायंकाळी ७ ते १० या वेळात संस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात गावातील लोकांचा  प्रतिसाद चांगला होता. रात्री १०.०० वाजता शिबिरार्थीना जेवण देण्यात आले. व रात्री  ११.०० विश्रांतीसाठी पाठविण्यात आले.

















## सहावा दिवस

दिनांक:- ०९/०२/२०१९

नियमित प्रमाणे सकाळी ५ ते ८ व्यायाम व प्राणायाम घेण्यात आले. सकाळी ८.०० वाजता विद्यार्थांना चहा व नास्ता दिल्या नंतर ९.०० वाजता सर्व धर्मीय समभाव रॅलीचे आयोजन करण्यात आले. या

रॅलीमद्धे समाज सुधारकांच्या वेशभूषा परिधान करून जन-जागृती करण्यात आली. त्या वेशभूषा खलील प्रमाणे.

- राष्ट्रीय सेवा योजनेचे बॅनर
- भारतमाता वेशभूषा
- लेजिम
- बैलबंडी वरती संत गाडगे महाराज यांची प्रतिमा
- संत तुकाराम महाराज व भजन मंडळी
- गाडगे महाराज व वारकरी मंडळी
- महात्मा ज्योतिबा फुले- सावित्रीबाई फुले- जिजामाता
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाबाई
- महाराष्ट्रियन, तेलगू, मल्याळम, मुस्लिम,पंजाबी, ख्रिस्ती, वेशभूषा परिधान
- रॅलीमद्धे सर्व समभावाचे नारे देण्यात आले. या रॅलीच्या नियोजनामद्धे रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे व प्रा. सी. पी. फरकाडे यांनी महत्वाची भूमिका बजावली. दुपारी १.०० वाजता विद्यार्थांना जेवण देण्यात आले. दुपारी २.०० वाजता वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वादविवाद स्पर्धेचे विषय खलील प्रमाणे.
- मोबाइलचे दुष्परिणाम
- आजची युवा पिढी
- पर्यावरणाचे महत्व
- भारतीय संस्कृती

या स्पर्धेमध्ये जवळपास ५० विद्यार्थांनी आपला सहभाग नोंदवला. वादविवाद स्पर्धेचे आभार संगीता सोनभोईर या विद्यार्थीनेने केले. सायंकाळी ७ ते ९ या वेळात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रात्री १०.०० वाजता विद्यार्थांनी जेवण घेतल्या नंतर १०.३० वाजता फिश पॉट हा कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश निवासी शिबिरामद्धे ज्या गोष्टीची कमतरता भासते तसेच शिबिरातून विद्यार्थांच्या जीवनात काय फरक पडू शकतो या विषयी विद्यार्थी आपल्या भावना व्यक्त करतात. रात्री ११.३० वाजता कॅम्प फायर करण्यात आला. यात सर्व विद्यार्थांनी आपले मनोगत व्यक्त केले, व शिबिराचे महत्व स्वतःमद्धे झालेली सुधारणा समाजाप्रती काम करण्याची तळमळ या विषयी विद्यार्थांनी आपले मनोगत व्यक्त केले. रात्री २.०० वाजता विद्यार्थांनी विश्रांति घेतली.

















# सातवा दिवस

दिनांक:- १०/०२/२०१९

समारोप

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर द्वारा आयोजित स्वच्छ भारत अभियान या विषयावर आधारित सात दिवासीय निवासी शिबिरचा समारोपिय कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता घेण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार प्रमुख अतिथि म्हणून डॉ. सुधीर फुलझेले, डॉ. केशव मेंढे, सरपंच प्रेमनाथ पाटील, रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. सी. पी. फरकाडे मंचावर उपस्थित .

समारोपिय कार्यक्रमाची सुरुवात थोर महापुरुषांच्या प्रतिमेला वंदन करून व विद्यापीठ गीताने करण्यात आली. या सात दिवसात विद्यार्थांना आलेला अनुभव पाहुण्यांसमोर कथन केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. डॉ. सुधीर फुलझेले व डॉ. केशव मेंढे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. व उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. प्रा. सी. पी. फरकाडे यांनी शिबिराकरिता ज्या ज्या लोकांनी सहकार्य केले त्या सर्वांचे आभार मानले. दुपारी २.०० वाजता सर्वांनी उत्कृष्ट भोजनाचा आनंद घेतला. सायंकाळी ५.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थिंना निरोप देण्यात आला. त्यांना बस मध्ये बसवून महाविद्यालयात रवाना करण्यात आले.

या सात दिवसात विद्यार्थांना प्राध्यापकांना गावातील जो प्रत्यक्ष अनुभव आला व गावातील जीवन प्रत्यक्ष अनुभवता आले या गोष्टी आयुष्यात नविसरण्या सारख्या आहे.


डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
स्वच्छ भारत अभियान

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
स्वच्छ भारत अभियान


राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
स्वच्छ भारत अभियान

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
स्वच्छ भारत अभियान


सकाळ



वागदरा : शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवर.

## देशाच्या विकासासाठी गरज 'युवाशक्तीची'

**गुमगाव :** देशाचे भवितव्य उज्ज्वल हवे असेल तर प्रथम आपल्या युवकांना अधिक सक्षम व सामर्थ्यवान बनवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. विकास जांभूळकर यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या वतीने वागदरा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य पी.सी. पवार, डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रेमनाथ पाटील, एम. डी. खारकर, मुख्याध्यापक मेश्राम, अरविंद वाळके उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे, संचालन मयूरी लहाने,आभार ऋतुजा पुनसे हिने मानले.

---

तरुण भारत

Nagpur Edition | 2019-02-12 | Page- 7

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात रासेयो शिबिर

◆ **नागपूर, ११ फेब्रुवारी**

दीक्षाभूमीस्थित डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन हिंगणा तालुक्यातील वागदरा गावातील प्राथमिक शाळेत झाले. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. विकास जांभूळकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. सी. पवार उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार प्रताप वाघमारे, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, सरपंच प्रेमनाथ पाटील, एम. डी. खारकर, मुख्याध्यापक चंपत मेश्राम, अरविंद वाळके उपस्थित होते. डॉ. विकास जांभूळकर यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात अशा शिबिरांची भूमिका महत्त्वाची असल्याचे मनोगत व्यक्त केले. पुस्तकातून ज्ञान मिळते पण व्यवहारिक जीवनातून प्रत्यक्ष अनुभव मिळते, तो अनुभव विद्यार्थ्यांनी आत्मसात करून मानवी सभ्यता वाढविण्याचा संदेश लोकांपर्यंत पोचविला पाहिजे. ◂ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

---

# 'रासेयोतून करा मानवतेची जोपासना'

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

### वागदरा येथे शिबिराचे उद्घाटन

'विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास करायचा असेल तर राष्ट्रीय सेवा योजना हा एक उत्तम मार्ग आहे. या शिबिरात सहभागी विद्यार्थी वेगवेगळ्या जाती-धर्मांचे असले तरी मानवता हा एकच धर्म जोपासून एकमेकांच्या अनुभवातून खूप काही शिकायला मिळते, गावातील सामाजिक जीवनाची माहिती मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी जी सेवा करतात ती निरागस व्हायला पाहिजे. शिबिरातून वास्तविक जीवनाची जाणीव करून घेणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. विकास जांभुळकर यांनी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे आयोजन हिंगणा तालुक्यातील वागदरा येथे करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन मंगळवारी प्रा. डॉ. विकास जांभुळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार प्रताप वाघमारे, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, सरपंच प्रेमनाथ पाटील, एम. डी. खारकर, मुख्याध्यापक संपत मेश्राम, अरविंद वाळके यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. जांभुळकर म्हणाले,'पुस्तकातून ज्ञान मिळते परंतु व्यवहारिक जीवनातून प्रत्यक्ष अनुभव मिळतो. तो अनुभव विद्यार्थ्यांनी आत्मसात करून मानवी सभ्यता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संवादातून लोकतांत्रिक प्रक्रिया घडते. बोलण्याचे स्वातंत्र्य आपल्याजवळ असल्यामुळे आपल्या मनातील भावना व्यक्त करता आल्या पाहिजे. निसर्गाला समतोल ठेवण्यासाठी पर्यावरणाचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवला पाहिजे.' प्रास्ताविकात कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे सांगताना या शिबिरादरम्यान गावात होणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी सरपंच प्रेमनाथ पाटील, अरविंद वाळके, सचिव एम. डी. खारकर यांनी गावातील समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मदत करावी व जनजागृतीच्या माध्यमातून गावातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीला झाडे लावण्याकरिता प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. पी. सी. पवार यांनी जनजागृती करण्यासोबतच समाजात नवा आदर्शही निर्माण करण्यास महाविद्यालय तत्पर असल्याची भावना व्यक्त केली.

---

सकाळ



वागदरा : गावात निघालेल्या दिंडीतून समाजप्रबोधन करताना तरुणाई.

## वागदऱ्यात नवनिर्मितीसाठी एकवटली युवाशक्ती

### सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाट्यातून समाजप्रबोधन

सकाळ वृत्तसेवा

गुमगाव, ता. २३ : क्रांती... तलवारीने नाही, तर चांगल्या विचारांनी आणि दृढ निश्चयाने घडते, असे म्हटल्या जाते. याच विचाराने प्रेरित होऊन समाजपरिवर्तन आणि नवनिर्मिती करण्याचा दृढनिश्चय युवाशक्तीने केला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत वागदरा येथे एकवटलेले युवा म्हणजे 'युग' बदलविणारे वादळ असल्याचा संदेश आपल्या सामाजिक कार्यातून देत आहेत.

उत्तुंग भरारी घेण्याची अफाट ताकद, प्रचंड ऊर्जा, भन्नाट उत्साहाने नवा आणि स्वच्छ भारत घडविण्याच्या निर्धाराने दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजची युवाशक्ती वागदरा येथे ग्रामीण जीवनाचा अभ्यास, समस्या व सामाजिक बांधीलकीतून विविध कार्य करीत आहे. विद्यार्थ्यांचा उत्साह व गावकऱ्यांकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे गावामध्ये वेगळेच चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले आहे.

सकाळी प्रार्थना झाल्यानंतर युवाशक्ती आणि ग्रामस्थांची गावातून दिंडी निघत असून 'चाहे धर्म अनेक हैं, देश हमारा एक है, जर्दा, गुटखा, पान मसाला, नव्या पिढीचा मौत मसाला' इत्यादी घोषणांनी आणि जागरगीतांनी वागदऱ्याचा परिसर दुमदुमून जात आहे. दररोज परिसंवाद, गटचर्चा, स्वयंस्फूर्त भाषण, सामाजिक खेळासारखे उपक्रम राबविल्या जात असल्याने युवाशक्तीसोबत ग्रामस्थानांही दिशा मिळत आहे. विद्यार्थ्यांचा उत्साह बघून प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, उपप्राचार्या डॉ. पल्लवी चोपडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडेसह कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. पी. फरकाडे, प्रा. संगीता सोमवंशी, प्रा. रोहिणी मेश्राम कौतुक करीत आहेत.

**सकाळी जागर, रात्री प्रबोधन**

दररोज सकाळी ५.३० वाजता जागर, व्यायाम त्यानंतर प्रार्थना, श्रमदान, जनसंपर्क, बौद्धिक स्पर्धा आणि रात्री सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून सांस्कृतिक कार्यक्रमातून गावकऱ्यांमध्ये लोकजागृती घडवून आणण्याचे विधायक कार्य युवाशक्ती करीत आहे.

तरुण भारत
Nagpur Edition | 2019-02-09 | Page- 3




गावात श्रमदानाला उपस्थित विद्यार्थी

# श्रमदानातून उमटला सामाजिक कार्याचा ठसा

## विद्यार्थ्यांनी केली जाणीवजागृती

**गुमगाव, ८ फेब्रुवारी**
नागपूर येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या कला, वाणिज्य व विज्ञानच्या विद्यार्थ्यांनी व प्राध्यापक, प्राचार्यांनी वागदरा (नवीन गुमगाव) येथे श्रमदान शिबिर राबविले. हे शिबिर येथील उच्च प्राथमिक शाळेत नुकतेच घेण्यात आले.

यात स्वच्छता अभियान, पर्यावरण वाढीसाठी वृक्षलागवड, व्यसनमुक्ती, बेटी बचाओ, बेटी पढाओ असे सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले. तसेच रात्रीच्या वेळी श्रमपरिहार म्हणून मनोरंजनाचे कार्यक्रम पार पडले. यात विद्यार्थी, प्राध्यापक व गावकऱ्यांनीही सहभाग घेतला. या शिबिराच्या माध्यमातून आरोग्य, पर्यावरणाचे फायदे व महत्त्व पटवून देण्यात आले. महाविद्यालयाने अशा प्रकारचा सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये गाव व देशाबद्दल स्नेह उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. मुलांनीही यात हिरिरीने सहभाग घेतला. या शिबिरात सरपंच, उपसरपंच, नागरिक, महिला, मुले आदींनी श्रमदान केले व गावाच्या विकासासाठी हातभार लावला. गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या या अभिनव उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला.

*(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

सकाळ

# वागदरा येथे मतदान जागृतीसाठी युवाशक्तीचा जागर

**गुमगाव, ता. १ :** 'मेरे पास पॉवर है...पैसा है... क्या है तुम्हारे पास? मेरे पास मताधिकार है'..'एक वोट की किमत तुम क्या जानो वोटरबाबू... लोकतंत्र की शान होता है, एक वोट... हर वोटर का अधिकार होता है...' अशा अफलातून आणि धडाकेबाज 'डायलॉग'च्या माध्यमातून वागदरा येथे एकवटलेली राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या युवाशक्तीने पथनाट्यातून मतदानाचा जागर केला.

'याद रखो ये तंत्र, उंगली बदलेगी लोकतंत्र' अशा आगळ्यावेगळ्या संवादाच्या माध्यमातून एका मताचे महत्त्व किती मोठे आहे, हे युवाशक्ती गावकऱ्यांना अभिनयाच्या माध्यमातून पटवून दिले. लोकांचा विशेषतः तरुणांचा त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. 'आई मला वोट द्यायला जायचंय, जाऊ दे न वं, प्रतिनिधी निवडायला जायचंय, जाऊ दे न वं... वय अठरा पूर्ण झालंय, जाऊ दे न वं...' या संवादातील पथनाट्याला युवाशक्तीनी नागरिकांकडून पाठीवर कौतुकाची थापही मिळविली. सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या नागरिकांमध्ये मतदानाबद्दल असलेली उदासीनता दूर करण्यासाठी घरोघरी, गल्लोगल्लीत जाऊन ही युवाशक्ती मतदानाचा जागर करीत आहे.

विद्यार्थ्यांचा उत्साह बघून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. सी. पी. फरकाडे, प्रा. संगीता सोमवंशी, प्रा. रोहिणी मेश्राम आणि सरपंच प्रेमनाथ पाटील कौतुक करीत आहेत.



वागदरा : पथनाट्यातून मतदान जागृती करताना युवाशक्ती.

Nagpur, NagpurGramin
02/03/2019 Page No. 5



# 'युवा शक्तीनेच देश बळकट होईल'

**प्रतिनिधी, नागपूर**

**युवा शक्तीनेच** देश बळकट होईल, असे मत डॉ. प्रभज्योत कौर यांनी व्यक्त केले. हिंगणा तालुक्यात सात दिवसांचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर नुकतेच पार पडले. यात डॉ. कौर आणि समीक्षक डॉ. सुरेंद्र गोंडाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'युवा शक्ती हीच देशाची शक्ती' या विषयावरील व्याख्यानात डॉ. प्रभज्योत कौर म्हणाल्या, आजचा युवकच देशाची लोकशाही जिवंत ठेवू शकतो. राष्ट्रीय एकात्मता मोडकळीस आली असून धर्माधर्मात जाती जातीमध्ये तणावाचे वातावरण आहे. अशावेळी युवाशक्तीच देशाचा आधारस्तंभ ठरू शकते. आजच्या युवकांनी धर्मनिरपेक्ष जाणीव जोपासल्या पाहिजे. डॉ. गोंडाणे यांनी युवा वर्गाला पत्रकारितेत येण्याचे आवाहन केले. युवाशक्ती हीच देशाची शक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी वैशाली धनविजय यांनी युवाशक्तीवर कविता, गझल सादर केल्या. याप्रसंगी अंकित मालखेडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छ भारत अभियान हा उपक्रम शिबिरामध्ये राबवत गावाच्या स्वच्छतेची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रवींद्र तिरपुडे होते.

लोकसत्ता Wed, 13 February 2019
https://epaper.loksatta.com/c/366

नव राष्ट्र

# युवाशक्तीनेच देश बळकट होईल

## प्रभज्योत कौर यांचे प्रतिपादन



नागपूर. आंबेडकर महाविद्यालयातर्फे नागपूर जिल्ह्यातील वगदरा ता. हिंगणा येथे सात दिवसाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सुप्रसिद्ध अभ्यासिका प्रभज्योत कौर यांचे तसेच सुरेंद्र गोंडाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

'युवाशक्ती हीच देशाची शक्ती' या विषयावरील व्याख्यानात प्रभज्योत कौर म्हणाल्या, आज युवाशक्तीने प्रत्येक क्षेत्रात पुढे आले पाहिजे. आजचा युवकच या देशाची लोकशाही जिवंत ठेऊ शकतो. आज राष्ट्रीय एकात्मता मोडकळीस आली आहे. धर्मा-धर्मात, जाती-जातीमध्ये तणावाचे वातावरण आहे. अश्यावेळी युवाशक्तीच देशाचा आधारस्तंभ ठरू शकते. आजच्या युवकांनी धर्मनिरपेक्ष जाणीव जोपासली पाहिजे. तसेच राष्ट्राला भरीव योगदान दिले पाहिजे. असे झाले तर हा देश जगत बलाढ्य देश म्हणून ओळखला जाईल व या देशाची लोकशाही मजबूत होईल, असे प्रभज्योत कौर म्हणाल्या.

याप्रसंगी वैशाली धनविजय यांनी युवाशक्तीवर आपल्या कविता, गझल सादर केल्या. अंकित मालखेडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून स्वच्छ भारत अभियान राबवतात, आपलं गाव, शहर कसं असलं पाहिजे, आपण जसे शरीराला स्वच्छ ठेवतो त्याचप्रमाणे आपल्या गावाला सुद्धा स्वच्छ ठेवले पाहिजे. आपले गाव स्वच्छ नसेल तर गाव रोगराइने ग्रस्त होइल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामग्रीतमध्ये दिलेली शिकवण हेच स्वच्छ भारत अभियान आहे असे यायप्रसंगी म्हणाले.

Orange City Plus Edition
16 Feb, 2019 Page No. 4

# युवा शक्तीनेच देश बळकट होईल

## डॉ. प्रभज्योत कौर यांचे प्रतिपादन

लोकशाही वार्ता/नागपूर

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर तर्फे नागपूर जिल्ह्यातील वागधरा ता. हिंगणा जिल्हा नागपूर येथे सात दिवसाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला अभ्यासिका डॉ. प्रभज्योत कौर, समीक्षक डॉ. सुरेंद्र गोंडाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

युवा शक्ती हीच देशाची शक्ती या विषयावरील व्याख्यानात डॉ. प्रभज्योत कौर म्हणाल्या, आज युवा शक्तीने प्रत्येक क्षेत्रात पुढे आले पाहिजे. आजचा युवकच या देशाची लोकशाही जिवंत ठेवू शकतो. आज राष्ट्रीय एकात्मता मोडकळीस आली आहे.

धर्मा-धर्मात जाती-जातीमध्ये तणावाचे वातावरण आहे.अशावेळी युवाशक्तीच देशाचा आधारस्तंभ ठरू शकते. आजच्या युवकांनी धर्मनिरपेक्ष जाणीव जोपासल्या पाहिजे. तसेच राष्ट्राला भरीव योगदान दिले पाहिजे. असे झाले तर हा देश जगत बलाढ्य देश म्हणून ओळखल्या जाईल व या देशाची लोकशाही मजबूत होईल असे डॉ. प्रभज्योत कौर म्हणाल्या.



समीक्षक डॉ. सुरेंद्र गोंडाणे यांनी आजच्या युवकांनी पत्रकारितेत येण्याचे आवाहन केले. आजची पत्रकारिता ही लोकशाहीचा महत्वाचा खांब असून यामध्ये युवकांचा सहभाग असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. पत्रकारितेच्या माध्यमातून सुद्धा समाजसेवा करता येते व राष्ट्राची भक्कम उभारणी करण्यात येते असे त्यांनी सांगितले,युवाशक्तीच हीच देशाची शक्ती असल्याचे त्यांनी सँगितले.

यांप्रसंगी प्रा. वैशाली धनविजय यांनी युवाशक्तीवर आपल्या कविता,गझल सादर केल्या. याप्रसंगी अंकित मालखेडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छ भारत अभियान हा उपक्रम शिबिरमध्ये राबवतात, आपलं गाव कसं असलं पाहिजे आपलं शहर कस कसं असलं पाहिजे, आपण जसे शरीराला स्वच्छ ठेवतो त्याचप्रमाणे आपल्या गावाला सुद्धा स्वच्छ ठेवले पाहिजे,आपले गाव स्वच्छ नसेल तर गावात दुर्गंधी वाढेल, ते गाव रोगराइने ग्रस्त होईल, म्हणून स्वच्छ भारत अभियान हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये दिलेली शिकवण हेच स्वच्छ भारत अभियान आहे, असे ते याप्रसंगी म्हणाले.

अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आजच्या युवकांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श ठेवून पुढे वाटचाल केली पाहिजे, युवा शक्तीच देशाचे भवितव्य आहे असे त्यांनी सँगितले. सात दिवसाच्या शिबिरामुळे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यार्थी- विद्यार्थिनी व गावातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.